# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११०१८

क क्षेत्रीय कार्यालय

**सभावृत्तांत (कार्यपत्रिका क्र.२८)**

(माहे सप्टेंबर २०१९ ची मासिक सभा)

दिनांक: ०४/०९/२०१९ वेळ: दुपारी १२.०० वाजता

-----------------------------------------------------------------------------------------------------------

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क प्रभग समितीची माहे सप्टेंबर २०१९ ची मासिक सभा बुधवार दिनांक ०४/०९/२०१९ रोजी सकाळी १२.०० वाजता क क्षेत्रिय कार्यालयाचे “श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृह” येथे आयोजित करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्मा.नगरदस्य/ सदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.बोइनवाड यशोदा प्रकाश | सभापती |
| २) | मा.लोंढे नम्रता योगेश | सदस्या |
| ३) | मा.गीता सुशिल मंचरकर | सदस्य |
| ४) | मा.राहुल हनुमंतराव भोसले | सदस्य |
| ५) | मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर | सदस्या |
| ६) | मा.समीर मोरेश्वर मासुळकर | सदस्य |

याशिवाय श्री.अण्णा बोदडे-क्षेत्रिय अधिकारी, श्री.दिलीप आढारी-प्रशासन अधिकारी, श्री.वसंत उगले-लेखाधिकारी, श्री.संजय घुबे-कार्यकारी अभियंता स्थापत्य, श्री.नितीन देशमुख- कार्यकारी अभियंता विद्युत, श्री.कांबळे बी.बी.सहाय्यक आरोग्याधिकारी, श्री.वाईकर-उपअभियंता ज.नि., श्री.बाळु लांडे-उपअभियंता विद्युत, श्री.महेश बरिदे, श्री.विनायक माने, श्री.वैभव पुसाळकर –उपअभियंता स्थापत्य, श्रीम.केदारी अ.अ.- क्रिडा पर्यवेक्षक, श्री.माने एस.डी.-कनिष्ठ अभियंता स्थापत्या इ.अधिकारी उपस्थित होते.

मा.सभापती यांनी उपस्थित सन्मा.नगरसदस्य/सदस्या व अधिकारी/कर्मचारी यांचे स्वागत करून सभा कामकाज सुरू करणेस अनुमती दिली.

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सुचक: मा.वैशाली घोडेकर अनुमोदक: मा.नम्रता लोंढे

माजी केंद्रीय अर्थमंत्री श्री.अरुण जेटली यांचे दुखद दिधन झाले आहे. त्यांना आजच्या सभेत श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य करण्यात आली.

(उपस्थितांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली अर्पण केली)

मा.सभापती यांचे परवानगीने खालील ऐनवेळेचे विषय सभा कामकाजात दाखल करून घेण्यात आले.

विषय क्र. १ : मा.राहुल हनुमंतराव भोसले यांचा विषय
प्रभाग क्र.९ मधील नियोजित इमारतीचे नामकरण करणेबाबत.

विषय क्र. २ : मा.यशोदा प्रकाश बोइनवाड यांचा विषय
प्रभाग क्र.६ मध्ये सोसायटी क्रमांकाचे बोर्ड लावणेस मान्यता देणेबाबत.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | १२ | विषय क्रमांक | : | १ |
| दिनांक | : | ०४/०९/२०१९ | विभाग | : | स्थापत्य |
| सुचक | : | मा.राहुल हनुमंतराव भोसले | अनुमोदक | : | मा.समीर मासुळकर |

संदर्भ : मा. राहुल हनुमंतराव भोसले यांचा विषय
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केलेप्रमाणे

प्रभाग क्र.९ मधील नेहरुनगर येथील राजीवगांधी विद्यालयाशेजारी स्वच्छतागृहाजवळ विठ्ठलनगर या ठिकाणी नियोजित समाजमंदिराचे इमारतीला "लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक हॉल" असे नामकरण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | १३ | विषय क्रमांक | : | २ |
| दिनांक | : | ०४/०९/२०१९ | विभाग | : | स्थापत्य |
| सुचक | : | मा.राहुल हनुमंतराव भोसले | अनुमोदक | : | मा.समीर मासुळकर |

संदर्भ : मा. यशोदा प्रकाश बोइनवाड यांचा विषय
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केलेप्रमाणे

प्रभाग क्र.६ मधील मधुबन सोसायटी मध्ये मधुबन सोसायटी क्र.१, मधुबन सोसायटी क्र.२, मधुबन सोसायटी क्र.३, मधुबन सोसायटी क्र.४, मधुबन सोसायटी क्र.५ या प्रमाणे बोर्ड लावण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला

यानंतर उपस्थितांचे आभार व्यक्त करून मा.सभापती यांनी सभा संपलेचे जाहीर केले.

सही/-
(बोइनवाड यशोदा प्रकाश)
सभापती (क प्रभाग समिती)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

साही/-
प्रशासन अधिकारी
तथा सचिव (सभाशाखा)
क क्षेत्रीय कार्यालय

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, क क्षेत्रीय कार्यालय
जा.क्र. कक्षेका/सभा/कावि/११४/२०१९ दि. : २४/०९/२०१९
प्रत: सर्व संबंधित शाखा प्रमुख व शाखाधिकारी

सभावृत्तांतामधील ठरावानुसार आपले विभागाशी संबंधित विषयाबाबत योग्य ती नियमाधिन कार्यवाही करणेत यावी. याबाबत वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.